I J R S S I S, Vol. VIII, Issue (3), May-2022 : 221-223 e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
A Double-Blind Peer Reviewed Journal OPEN ACCESS Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# 'निवडक कथाकारांच्या कथासाहित्यातून प्रतिबिंबित झालेले वास्तव ग्रामजीवन'

पुरुषोत्तम सूर्य

संशोधक विद्यार्थी

Corresponding Author : purushottamsurya11gmail-com

| Communicated : 05.04.2022 | Revision : 08.04.2022<br>Accepted : 15.04.2022 | Published : 02.05.2022 |
|---|---|---|

नंतर निर्माण झालेली ग्रामीण साहित्य चळवळ ही महत्वाची चळवळ आहे. याचळवळीतूनच ग्रामीण साहित्याची निर्मिती झाली. ग्रामीण साहित्य चळवळीला महात्मा जोतीराव फुले यांचे अधिष्ठान आहे. म. फुले यांचे 'गुलामगिरी' 'शेतकऱ्याचा आसूड' हे महत्वाचे ग्रंथ आहेत. ग्रामीण साहित्याच्या केंद्रस्थानी आहे. कारण शेती हाच ग्रामीण भागातील मुख्य व्यवसाय आहे. शेती मुख्यत्वे अर्थव्यवस्थेशी प्रामुख्याने निगडीत आहे. शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक, शेतीमालाला योग्य भाव व खर्चाच्यादृष्टीने शेती परवडत नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या या सर्व गोष्टींचा समावेश ग्रामीण साहित्यातून झाला आहे.

नंतर ग्रामीण साहित्यक्षेत्रात कथेचा प्रवाह विकसित होत गेलेला दिसून येतो. या कालखंडात शंकरराव खरात, आनंद यादव, रां. रं. बोराडे , महादेव मोरे , द. ता. भोसले, भास्कर चंदनशिव, बाबाराव मुसळे, व्यंकटेश माडगुळकर, सदानंद देशमुख, नागनाथ कोतापल्ले, वासुदेव मुलाटे, राजन गवस, श्रीकांत देशमुख, महेश मोरे अशा ग्रामीण कथाकारांनी ग्रामीण जीवनाचे यथासांगचित्र लेखनातून उभे करण्याचा यशस्वी प्रयत्न दिसून येतो.

एकूणच ग्रामीण कथेचा आवाका लक्षात घेता ग्रामीण कथेत खेड्यातील माणसांच्या व्यथा—वेदना,दु:ख, कष्ट, अनोळखिपणा, शून्यता, वाढती व्यसनाधीनता, तरुणांसमोर रोजगाराचे प्रश्न, ढासळते मूल्य, नातेसंबंधातील दुरावा,नैसर्गिक आपत्ती यासारख्या अनेक घटना, प्रसंगाचे चित्रण अधोरेखित होते. त्याचप्रमाणे महिलांचे अनेक प्रश्न कथेतून प्रकर्षाने अनेक कथाकारांनी मांडलेली दिसून येतात. त्याअनुषंगाने काही निवडक ग्रामीण कथाकारांच्या कथांचा व त्यांच्या कथांतून येणाऱ्या ग्रामीण जीवन चित्रणाचा आढावा घेवून उचित निष्कर्ष मांडणे हा या शोधनिबंधांचा हेतू आहे.

नागनाथ कोतापल्ले हे मराठी साहित्यातील एक श्रेष्ठ कथाकार असून आपल्या कथेतून प्रामाणिक आणि प्रांजळ असे अनुभवविश्य साकारले आहे. त्यात सामाजिक , धार्मिक , कौटुंबिक ,शैक्षणिक , बालकथा , ग्रामीण नागरी , दीर्घकथा इत्यादी कथा आशयांच्या उल्लेख करता येईल. ग्रामीण नागरी जीवनातील शैक्षणिक , सामाजिक, राजकीय , आर्थिक समस्यांचे परिणामकारक दर्शन घडविणे , ग्रामीण—नागरी जीवनातील हतबल स्त्री—पुरुष , त्यांचे विविध प्रश्न , मानवी भावविश्वातील ताणतणाव , माणसाच्या आदिम प्रेरणा आणि त्याचे बदलते संदर्भ, माणसाची अर्थपूर्ण नाती, अज्ञान , दारिद्रय, मानवी मनांची होणारी विलक्षण कोंडी, घुसमट, सामाजिक, आर्थिक, राजकीय या शेत्रातील दांभिकतेचा तीव्र संताप, तलस्पर्शी समाजवास्तव, समाजातील सर्व स्तरांबद्दलची जागृती, जाणीव, जीवनातील गुढ—नियती इत्यादी वैविध्यपूर्ण विषय कोतापल्ले यांनी कथालेखनातून हाताळलेले दिसतात. त्यांचे हे लेखन म्हणजे सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेला लाभलेले एक महत्वाचे योगदान आहे

तसेच त्यांच्या कथेतून स्त्रीमनाचे प्रतिबिंब उमटलेले आहे. विधवा, परीव्यक्ता, शेतकरी स्त्री, राजस्त्रिया, मजूर, वंचित स्त्री, घुसमट होणारी स्त्री, कलावंत स्त्री, आधुनिक स्त्री इत्यादी स्त्री व्यक्तिरेखांचे चित्रण प्रकर्षाने मांडलेले आहे. बदलत्या ग्रामीण जीवनाचा आशय आपल्या अनेक कथांमधून राजन गवस यांनी अधोरेखित केला आहे. आधुनिकतेमुळे बदलत्या ग्रामिनातेवरील परिणाम वेधण्याचा प्रयत्न 'सुत्तडगुत्तड ' या सदराअंतर्गत केला आहे.

पृथ्वीवरील सर्वात बुद्धिमान प्राणी म्हणून माणसाचा उल्लेख केला जातो. त्याने आपल्या मुठीच्या आणि मनगटाच्या जोरावर स्वत:ला सर्वश्रेष्ठ बनवून पृथ्वीवर अधिपत्य गाजवण्याची मुभा घेतली. पण आता त्याला पृथ्वीवर आपण सोडून दुसर कोणीच असू नये असे तीव्रपणे वाटत आहे. याचा भक्कम पुरावा म्हणजे ओस पडत चाललेला गोठा. कधी—काळी भरलेला गोठा घराच गोकुळ करायचा. दुधदुभत्याच घर म्हणजे खातपीत घर.

त्याच घराणे या मुक्या प्राण्यांना केल हातोहात बेदखल उद्या बैल नामशेष करण्यात , म्हैस नामशेष करण्यात तोच असेल आघाडीवर. मग याला भावना आहेत असं म्हणायचं तरी कसं? भावना, बुद्धी, कल्पना माणसाजवळ आहेत, याचे पुरावेच तो हळूहळू नष्ट करत चालला आहे. यालाच विकास आणि आधुनिकता म्हणायचे असेल तर माणसासाविध्वंस जवळ आला आहे, असं म्हणायला कोण्याही जोतीष्यांची गरज नाही.

ट्रक्टर आला नि बैल गोठ्यातून हद्दपार झाला मग गल्लीतून हद्दपार होत होत गावातूनही गेला. दोन महिन्याच्या शेतीकामासाठी बारा महिने फुकट बैल पोसणे तोट्याचे वाटू लागले आणि नवचं वर्तमान समोर आलं बहुतांशी कोरडवाहू शेतकऱ्यांना आज जगवते आहे ती त्यांची गोठ्यातील म्हैस. तीच घराची पोशिंदी, मुलाचं शिक्षण, लेकीचा आयरमाह्यार, पाहुणपैंच आगत—स्वागत सारचं चालत असते या म्हशीच्या जीवावर पाऊसपाणी, शेतीभाती सगळेच बेभरवशाचे म्हैस बनली आहे गावाचा जगण्याचा आधार

भास्कर चंदनशिव यांच्या कथांमधून दुष्काळाचे चित्रण मोठ्या प्रमाणावर आलेले आहे. कारण त्यांच्या लेखनाचा काळ हा  नंतरचा आहे. मराठवाडा त्यातील बीड जिल्हा कमी पर्जन्यमान असल्यामुळे ग्रामीण जनतेवर सतत दुष्काळाचे सावट असते. त्यामुळे त्याप्रदेशाचे चित्रण त्यांच्या कथांमधून आलेले आहे. दुष्काळाची सर्वात जास्त झळ स्त्रीवर्गाला बसते. दुष्काळामुळे स्त्रियांना रोजगार हमीच्या कामावर जावे लागते. तेथे स्त्रिया मुकादमाच्या वासनेच्या शिकार होतात. तर त्यांच्या ‘पिळ’ या कथेतील चंपाच्या कुटुंबालाही दुष्काळाची झळ सहन करावी लागते. निचा नवरा राबराब राबतो पण तिला कामाला जाऊ देत नाही कारण कामाच्याठिकाणी चालणारे अवैध प्रकार त्याला चांगलेच माहित असतात. कामाच्याठिकाणी वास्तवस्थिती सांगतांना चंपाचा नवरा सांगतो की, ‘अमका मुकादम रोज नवी गाठतोय म्हणून .... अन एखादी नाय मन्ली.... तर माय, तिला पोटावर बिबवंच घालाव लागल्यात’...

स्वातंत्र्यप्राप्त झाल्यानंतरही शहरी भागातील स्त्रीच्यामानाने ग्रामीणस्त्रीचे जगणे बंधनातच असल्याचे दिसून येते. पुरुषप्रधान संस्कृतीचा ग्रामीण भागात आजही वरचष्मा कायम असल्याने ग्रामीण जीवनातील स्त्रियांना दुय्यमस्थानी ठेवले आहे. विविध प्रकारचे नातेसंबंध निभवतांना तिला अनेक संकटांचा सामना करावा लागतो. तिचे विविध पातळीवरचं जगणं, तिचे प्रश्न आणि दोलायमान अवस्था या संदर्भात द.ता. भोसले यांनी त्यांच्या साहित्यातून वेध घेतला आहे. ‘अन्न’, ‘पाऊस’, ‘पार आणि शिवार’, ‘जन्म’ह्या कथासंग्रहातून ग्रामीण जीवनातील स्त्रीजीवनाची वैविध्यरूपे उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

‘पार आणि शिवार’ या कथासंग्रहातून स्त्रीचे जीवन चित्रित करतांना त्यांच्या अनुभवाच्या सूक्ष्म निरीक्षणाची, खोलवर जाऊन मनाचा तळ गाठण्याच्या क्षमतेची जाणीव होते.

या जगात जनावर म्हणून जगाव पण गरीब बाई म्हणून जगू ने बाबा, ढोरापारीस लई तरास बाबा!

‘परिक्षा’ सारख्या कथेतील नायिका आपले पावित्र्य सिद्ध करण्यासाठी उकळत्या तेलात हात घालायला तयार होते. सासरच्या शंकेचे निरसन करण्यासाठी कठोर परीक्षेस ती तयार होते.

आपुन जर सिंदळगी केलीच न्हाय तर भ्या कशाला ? काय व्हयाच ते होऊ दे

ग्रामीण साहित्यातील एक महत्त्वाचे नव म्हणजे आनंद यादव. आनंद यादवांची कथा मुळ प्रकृतीधर्माशी सूक्ष्म तरल संवेदनशील अनुभूतीशी ताकदीने उभी राहते. त्यांच्या कथेच्या संदर्भात प्रा.म. हातकणांगलेकर ‘मराठी कथारूप आणि परिसर या ग्रंथात यादवांच्या कथेविषयी म्हणतात’ ‘ग्रामीण दुखा:ला ते संगीताचे लावण्य प्राप्त करून देतात. अनुभव लयकार होऊन बाहेर पडतात व त्यांच्या कथा लयकथा बनतात. ‘खळाळ’ ‘घरजावई’ ‘माळावरची मैना’ ‘आदिताल’ ‘उखडलेली झाडे’ इत्यादी कथासंग्रहातून ग्रामीण वास्तवाला कलात्मक पद्धतीने रेखाटले आहे. ‘आदिताल’ या संग्रहातील ‘गाळ’ ही कथा वास्तपातळीचे जीवन प्रतीत करते. विहिरीचे काम चालू असतांना रांगेत उभ्या असलेल्या मजुरांचे जीवन कोणत्याही क्षणी धोक्यात येऊ शकते. त्या विहिरीचे वर्णन  प्रतिमांतून रेखाटतांना आनंद यादव म्हणतात वाकून बघितलं तर विहिरीत काळधूम दिसतंय किती खोल फोडीत न्हेलीया आत पाण्याच्या वाटणीचा अंधार भरलाय असं वाटावं. त्या अंधारातन मानसं मुंग्यांसारखी हळूहळू वर येतांना दिसतात. विहीर म्हणजे कष्टकरी सामान्य माणसांच्या जीवनाचे प्रतिक!

वर्तमानसमाजवास्तव आणि वऱ्हाडी ग्रामीण संस्कृतीचे दर्शन डॉ. रामदास गोविंदराव चवरे यांच्या कथेतून चित्रित होते. डॉ.चवरे यांच्या ‘शतावरी’ह्या कथासंग्रहातून अविवेली छंदापायी महाविद्यालयीन शिक्षण घेत असलेल्या एका ग्रामीण विद्यार्थ्याच्या उध्वस्त जीवनाची शोकांतिका ‘उध्वस्त’ या कथेतून समोर येते. कथेचा नायक सुधा याला सिनेमा बघण्याचा अतिरेकी छंद होता. त्याछंन्दापायी त्याला मारझोड, पोलीस केस या प्रसंगाना सामोरे जावे लागते.

मोलमजुरी करणाऱ्या त्याच्या विधवा आईची व कुटुंबाची दैना—वाताहात कथेतून मांडतांना

'तिला गावी येऊन दोन दिवस होत नाहीत तर पोलीस दारात हजार, का तर माग सुधान सिनेमा टाकीजसमोर मारामारी केल्याबद्दल त्याच्या नावे रिपोर्ट आहे. राधाबाई पोलिसांकडे पाहून म्हणाली—

हे आहे सुधाच मळ. न्या त्याले उचलून अन गाळून टाका पोलीस ठाण्यात आवारात आक्रोश, पीळवटलेलं हृद्य आकांत सुधाच्या मृत्युनंतर राधाबाईच्या कंपनांच्या स्वरातून कथाकारांने मूखोद्गत केला आहे.

माहा पोरगा मेला. आता माह्यावर केसं करा, न्या त्याले मारलं म्हणून होऊन जाऊ दया तुमचा कलेजा थंडा.

**निष्कर्ष:—**

१) निवडक ग्रामीण कथाकारांच्या साहित्यातील ग्रामीण जीवनाचे सर्वांगीण दर्शन घडविण्याचा प्रयत्न करणे.

२) ग्रामीण जीवनातील वास्तवतेच घटना—प्रसंग—व्यक्ती यांच्या आधारे शोध घेणे.

३) ग्रामीण माणसाच्या स्वभाव , वैगुण्यावर अचूक बोट ठेवणे.

४) बदलत्या खेड्याचे ग्रामीण जीवनशैलीचे दर्शन घडविणे.

५) ग्रामीण माणसाचे दु:ख , वेदना , कष्टकरी जीवनाची प्रलक्ष अनुभूती प्रतीत करणे.

६) ग्रामीण कथेतून स्त्रीजीवनाच्या वास्तवावर प्रकाश टाकणे.

एकूणच ग्रामीण विकासाला पुरक अडसर ठरणाऱ्या घटकांचा, अभ्यास करून त्या अनुषंगाने उपायांची अंमलबजावणी करणे.

**संदर्भ :**

नागनाथ कोतापल्ले व्यक्ती आणि वाडमय डॉ.संजय शिंदे, चिन्मय प्रकाशन

नागनाथ कोतापल्ले यांचे समग्र साहित्य एक चिकित्सक अभ्यास,चांदोबा केरबा तलवारे

डॉ. राजन गवस— लोकसत्ता साहित्य पुरवणी 'चतुरंग' (संप्टेंबर )

नवी वारूळ— भास्कर चंदनशिव, अनुपम प्रकाशन औरंगाबाद (प्रथमावृत्ती ) (कथासंग्रह)

मरणकळा— भास्कर चंदनशिव— (प्रथमावृत्ती ) (कथासंग्रह)

'पार आणि शिवार'— प्रथमावृत्ती ( प्रतिमा प्रकाशन पुणे) (कथासंग्रह)

'आदिताल'— आनंद यादव (प्रकाशनवर्ष ) (कथासंग्रह)

शतावरी'— डॉ. रामदास चवरे (गोदा प्रकाशन)